# के. के. वाघ कॉलेजची ‘एबीबी एक्स्पो’त बाजी

**नाशिक | प्रतिनिधी**

एबीबी डिजिटल एक्स्पोमध्ये के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत सलग चौथ्या वर्षी पारितोषिक पटकावले.

कार्यक्रमास डॉ. संतोष नारायण खेडकर, अध्यक्ष समीर वाघ हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी एबीबीचे उपाध्यक्ष दयानंद कुलकर्णी, मनोज वाघ, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर उपस्थित होते. के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातून दर्शन गवारले, गायत्री दुसे, सोनम उगले, आर्यन भानुसे आणि अल्तमस शेख या विद्यार्थ्यांची एबीबी डिजिटल एक्स्पोसाठी निवड करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक अभ्यासक्रम सांभाळत



तीन महिने, आठवड्यातून दोन दिवस एबीबी डिजिटल एक्स्पोवर काम केले. या कालावधीत त्यांनी उद्योगात प्रत्यक्ष समस्या ओळखून आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रभावी उपाय सुचवले.

दै. देशदूत पेपर, दि.१७फेब्रुवारी २०२६